# रे.क.नं. ७०/२०१४ मध्ये निशाण १०४ खालील आदेश.

यातील प्रतिवादी क्र. ६ यांनी प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकतीमधील नवीन बांधकामकरीता आर.सी.सी. घराची नोंद ग्रामपंचायत मिळकत रजिस्टर आठ 'अ' ला करणेकामी प्रतिवादी क्र. ६ ला अंतरिम परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जाला यातील वादी यांनी याच अर्जावरती म्हणणे दाखल करुन हरकत नसल्याचे म्हणणे दाखल केले आहे. यातील प्रतिवादी क्रमांक १ यांनी निशाणी ११२ ला म्हणणे दाखल करुन तीव्र हरकत नोंदविलेली आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांनी अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे.

३. यातील प्रतिवादी तर्फे व वादीतर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

४. यातील प्रतिवादी क्र. ६ यांनी असे कथन केले आहे की, त्याने सदर दावा मिळकतीमध्ये आर.सी.सी.घराचे बांधकाम केले आहे. सदर घराचे बांधकाम सुरु असलेवेळी यातील प्रतिवादी क्रमांक १ यांनी हरकत घेतलेली होती. प्रस्तुत प्रतिवादी यांनी त्यांचे घराचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर माननीय सरपंच यांच्याकडे दिनांक १४.०९.२०१५ रोजी त्यांच्या नावाच्या नोंदीबाबत अर्ज केला होता. त्यावर यातील प्रतिवादी क्रमांक १ ते ४ यांनी त्याठिकाणी हरकत नोंदवून दावा मिळकतीबाबत न्यायालयात वाटपाचा दावा प्रलंबित आहे त्यामुळे बांधलेल्या घरास नांव लावण्यात येवू नये अशी तक्रार केली आहे. त्यामुळे अद्याप प्रस्तुत प्रतिवादीच्या नावाची नोंद ग्रामपंचायत दप्तरी झालेली नाही. अशाप्रकारे प्रतिवादी क्रमांक १ ते ४ प्रतिवादी क्र. ६ ला हरकत करत असून तिच्या नावाची नोंद होवू देत नाहीत. त्यामुळे प्रस्तुत प्र.वादी यांनी दावा मिळकतीमधील नवीन बांधकामाची नोंद प्रस्तुत प्रतिवादींच्या नांवे

ग्रामपंचायत दप्तरी होणेसाठी या न्यायालयाची अंतरिम परवानगी मिळावी म्हणून अर्ज केला आहे.

५. सदर कामी प्रतिवादी क्र. १ ने अशी हरकत नोंदविली की, प्रतिवादी क्र. ६ ने बांधलेल्या आर.सी.सी. इमारत हा दाव्याचा विषय नाही. दावा हा वाटपाकरिता दाखल केला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार दावा मिळकतीचे पुर्वीच वाटप झाले आहे. त्यामुळे दावा मुळात चालणेस पात्र नाही. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन करता प्रतिवादी क्रमांक ६ ने बांधलेले घर हा दाव्याचा विषय नाही. तसेच प्रतिवादी क्र. ६ विरुध्द या न्यायालयाचा कोणताही मनाई आदेश नाही. प्रतिवादी क्र. ६ यांचा या दाव्यात प्रतिदावा नाही. तसेच त्या अनुषंगाने कैफियत नाही. तसेच प्रतिवादी क्र. ६ च्या बांधकामाबाबत व त्याच्या नोंदीबाबत या न्यायालयाने कोणताही अंतरिम मनाई आदेश दिलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी यांना अशाप्रकारे या न्यायालयाची अंतरिम परवानगीची आवश्यकता नाही. तसेच प्रस्तुत कामी प्रतिवादी क्रमांक ६ च्या नोंदीबाबतचे अधिकार ग्रामपंचायत अधिनियम व जिल्हा परिषद अधिनियम या कायद्यान्वये त्या–त्या ग्रामपंचायत अधिका–यांना येतात. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी यांना योग्य ती दाद पर्यायी यंत्रणेसमोर मांडून नोंदी बाबत आदेश घेता येतात. अशास्थितीत प्रस्तुत प्रतिवादीचा अर्ज प्रथमदर्शनी चालणेस पात्र नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याच्या निष्कर्षावर येत आहे व खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश.**

प्रतिवादी क्रमांक ६ यांचा नि.१०४ चा अर्ज फेटाळण्यात येत आहे.

सही/–
(सं.मा.जाधव)
दुसरे सह. दिवाणी न्यायाधिश,क.स्तर.
पेठवडगांव.

पेठवडगाव
दि.०३.०५.२०१७

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Mrs. Rajashri Rajendra Sawant (L.G.) |
| Name of Court | Shri. S.M.Jadhav, 2nd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Peth Vadgaon |
| Date of Dictation | 03-05-2017. |
| Judgment signed by the P.O. on | 03-05-2017. |
| Judgment/Order uploaded on | 06-05-2017. |